# शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी उपाययोजना करा

## आ.मोनिका राजळे यांचे कृषी विभागाला निर्देश; खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – आगामी खरीप हंगाम सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना सुलभ सेवा व योग्य मार्गदर्शन मिळावे, त्यांची फसवणूक अथवा अडवणूक होऊ नये यासाठी कृषी विभागाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश आमदार मोनिका राजळे यांनी दिले आहेत.

पंचायत समितीतील लोकनेते गोपीनाथ मुंडे सभागृहात खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत आमदार राजळे बोलत होत्या. यावेळी नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, गट विकास अधिकारी शिवाजी कांबळे, उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, दिगंबर भवार, सुभाष बर्डे, संदीप पठाडे, विष्णुपंत अकोलकर, सुनील ओव्हळ, नारायण पालवे, चारुदत्त वाघ, अविनाश पालवे, मुकुंद आंधळे, सतीश मुनोत, दिलीप रोकडे, महादेव दराडे, दरंदले, सुरेश बडे आदी उपस्थित होते.



**पाथर्डी येथे खरीप पूर्व हंगाम नियोजन आढावा बैठकीत बोलताना आमदार मोनिका राजळे. (छाया – नारायण पालवे)**

राजळे म्हणाल्या, खरीप हंगामात खत, बी-बियाण्यांच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता लक्षात घेता कृषी विभागाने भरारी पथकाची स्थापना केली आहे. या भरारी पथकाच्या माध्यमातून दुकानदारांवर थेट कारवाई होऊ नये यासाठी प्रशासन व दुकानदार यांच्यात योग्य समन्वय असावा. तसेच बोगस, डुप्लिकेट बी-बियाणे व खते विक्रीला आळा बसावा यासाठी सर्व कृषी दुकानदारांनी प्रशासनास सहकार्य करावे. कृषी विभागाने दुकानदारांच्या छोट्या-मोठ्या अडचणी समजून घ्याव्यात, राज्य सरकारने आखलेला शंभर दिवसांचा कृती आराखडा वर्षभरासाठी (३६५ दिवस) राबवण्याचे आवाहन करत, कृषी विभागाने पंचायत समितीच्या समन्वयाने शेतकऱ्यांसाठीच्या योजना प्रभावीपणे पोहोचवाव्यात. पीएम किसान योजनेतील त्रुटींसाठी आठ दिवसांमध्ये कॅम्प घेण्यात यावा, पिक विमा रक्कम तातडीने वाटप करण्यात यावी. मंडल निहाय पर्जन्यमापक बसवली आहेत का याची खात्री करून ती सुस्थितीत ठेवावी. तसेच तालुका पातळीवर शेतीतील माती परीक्षणाचे आयोजन कृषी विभाग करावे, असे निर्देशही आमदार राजळे यांनी यावेळी दिले. आभार विशाल साबदे यांनी मानले.

# महत्त्वाचे

## मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबीर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने भगवान गौतम बुध्द जयंती (बौध्द पौर्णिमा) व छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरदेवळे (ता. नगर) येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिराला ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात तब्बल ३४८ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तर ७३ गरजूंवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया पार पडणार आहे. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात झालेल्या शिबिराप्रसंगी फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, जलसंपदा विभागाचे माजी अधिकारी प्रमोद खडामकर, मयाबापू राशीनकर, ज्ञानेश्वर भांड आदींसह शिबिरार्थी रुग्ण व ग्रामस्थ उपस्थित होते. शिबिरात निवड झालेल्या रुग्णांची पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया होणार आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी विशाल भिंगारदिवे, सौरभ बोरुडे, आप्पासाहेब काळे आदींसह फिनिक्सच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## चेअरमन शिंदे यांचा सत्कार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी आप्पासाहेब शिंदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा जिल्हा हमाल पंचायतच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष गोविंदराव सांगळे, सचिव मधुकर केकाण, संजय महापुरे, रविंद्र भोसले, नंदू डहाणे, बबन सुसे, रत्नाबाई अजबे, अनिल थोरवे, शाहुल वडागळे, अंबादास उगलमुगले, तबाजी कार्ले, अर्जुन शिंदे, युवराज राऊत, होळकर आदी उपस्थित होते. यावेळी घुले म्हणाले, सर्वांनी एकत्र येऊन शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शिक्षक हे समाजाचा पाया आहेत, आणि त्यांचं सशक्तीकरण झालं तरच समाज सशक्त होईल,असे सांगून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना शिंदे म्हणाले, ही निवड माझी वैयक्तिक नाही, शिक्षक बांधवांच्या विश्वासाची आणि आशेची आहे. शिक्षकांच्या अडी-अडचणी, त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे, आणि शैक्षणिक व्यवस्था अधिक सक्षम बनवणे हे प्राथमिक उद्दिष्ट राहील आणि आपल्याला ती अधिक बळकट करायची आहे. प्रास्तविक रविंद्र भोसले यांनी केले. सुत्रसंचालन संयज महापुरे यांनी केले. तर आभार गोविंदराव सांगळे यांनी मानले.

## राज्यस्तरीय वत्कृत्व स्पर्धांचे आयोजन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले आहे. या महोत्सवा अंतर्गत राज्यस्तरीय वत्कृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा प्रार्थमिक व अंतिम अशा फेऱ्यांमध्ये होणार आहे, अशी माहिती संयोजन समितीचे विशारद पेटकर यांनी दिली.ही राज्यस्तरीय वत्कृत्व स्पर्धा महाविद्यालयीन विधार्थी व १८ वर्षांपुढील स्पर्धाकांसाठी खुली आहे. या स्पर्धेसाठी स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सबलीकरणाचे प्रतीक व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक हे विषय देण्यात आहेत.स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी स्पर्धकांनी स्पर्धेच्या विषयांपैकी निवडलेल्या विषयावर जास्तीत जास्त पाच मिनिटे स्वतःचा भाषण करतानाचा व्हिडिओ तयार करून संयोजकांकडे दिनांक १६ मेपर्यंत पाठवायचा आहे. त्याचे परीक्षण होऊन प्राथमिक फेरीतून निवडलेल्या वीस स्पर्धकांची दि.२३ मे रोजी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड केली जाणार आहे. स्पर्धेची अंतिम फेरी न्यू आर्ट्स महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये होणार आहे.

## ‘त्या’ ठेकेदारावर कारवाईची मागणी

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील जोहरापूर ते भातकुडगाव हा अंतर्गत रस्ता ठेकेदाराने विनापरवानगी खोदल्याने परिसरातील नागरिकांना नाहक त्रासाचा सामना करावा लागत आहे. अधिकाऱ्यांनी या घटनेबाबत मात्र बघ्याची भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. जोहरापूर ते भातकुडगाव हा अंतर्गत पाच किलोमीटरच्या रस्त्याचा काही भाग एका ठेकेदाराने गर्जे वस्ती ते ढगे वस्ती विनापरवानगी खोदल्याने या रस्त्यावर खड्डे व खडी दिसत आहे, त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित ठेकेदारावर कारवाई व्हावी, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे. दरम्यान, ठेकेदाराने विनापरवानगी रस्ता खोदला असून संबंधित ठेकेदाराला तो रस्ता पुन्हा सपाट करण्यासाठीच्या सूचना देण्यात आल्या होत्या. ठेकेदाराने काही रस्ता सपाट केला आहे; परंतु काही रस्ता तसाच राहिला असल्याचे शेवगाव बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रल्हाद पाठक यांनी सांगितले.

## दुचाकी पेटविली ; गुन्हा दाखल

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील भवरवाडी येथील शरद भीमराव गाडेकर (वय ४७) यांची दुचाकी (एमएच १६ एएफ १५४६) शनिवारी (दि. ३) मध्यरात्री पेटविण्यात आली. गाडेकर यांनी याबाबत पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकी शेडमध्ये लावण्यात आली होती. रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास जनावरांचा आवाज येताच गाडेकर कुटुंब जागे झाले. त्या वेळी दुचाकी पेटलेली दिसली. पत्नी रंदावणी यांनी दोन अज्ञात व्यक्तींना रस्त्याकडे पळताना पाहिले. या प्रकरणी दोन अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहे.

## बारावी परीक्षेत श्रीगोंद्याचे यश

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील येळपणे गटातील देवदैठण, उक्कडगाव आणि ढवळगाव येथील विद्यालयातील मुलींनी बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. देवदैठण येथील विद्याधाम कला कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ८६.६६ टक्के लागला. परीक्षेला ३० विद्यार्थी बसले. त्यापैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रियंका चंद्रकांत शिंदे हिने ८२.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. श्रुती विलास खोले हिने ६९.६७टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. गौरी राजाभाऊ वाघमारे ६५.३३ टक्के गुण मिळवून तिसरी आल्याची माहिती प्राचार्य विशाल डोके यांनी दिली. उक्कडगाव येथील मुंजाबा विद्यालयातील १३ विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, वियालयाचा ७६.९२ टक्के निकाल लागला. यात प्रतीक्षा राजेंद्र सकट ५७.१७ टक्के गुण मिळवत प्रथम आली. दिव्या हरिदास पवार ५३.३३ टक्के गुण प्राप्त करीत द्वितीय आली. प्रतीक आबासाहेब बेंद्रे ५२.८३ टक्के गुण मिळवत तृतीय आल्याची माहिती मुख्याध्यापक भाऊसाहेब शितोळे यांनी दिली. ढवळगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयाचा निकाल ६९.६९ टक्केलागला. ३५ पैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. किरण शहाजी म्हस्के याने ७७.१७टक्के गुण मिळवत प्रथम मिळविला. पायल गिरीश चोरमले ७३.५० टक्के गुण मिळवत द्वितीय आली, तर ६१.६७ गुण मिळवत संतोषी शिवाजी ढवळे तृतीय आल्याची माहिती मुख्याध्यापक मधुकर सुपेकर यांनी दिली.

# कानडे मळा परिसराला जोडणाऱ्या रस्त्याचे अडथळे दूर

## जागा मालक, स्थानिक नागरिक, अतिक्रमणधारकांशी चर्चेतून निघाला मार्ग

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– स्टेशन रोड व सोलापूर महामार्गाला जोडणाऱ्या, तसेच सोलापूर महामार्ग ते कानडे मळामार्गे सारसनगरला जोडणाऱ्या हॉटेल फरहत ते महावितरण ते भिंगार नाला रस्त्याच्या मार्गातील अडथळे दूर झाले आहेत. या रस्त्यात बाधित होणाऱ्या जागा मालकांशी, नागरिकांशी चर्चा करून मार्ग काढण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच या रस्त्याचे रखडलेले काम पूर्ण होऊन, रस्ता नागरिकांसाठी खुला होईल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

सोलापूर महामार्ग ते कानडे मळा रस्त्यासाठी व या मार्गाला जोडणाऱ्या हॉटेल फरहत ते भिंगारनाला रस्त्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. हॉटेल फरहतपासून भिंगार नाल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही ट्रस्ट व नागरिकांच्या जागा बाधित होत आहेत. काहींची अतिक्रमणे आहेत. त्यामुळे या रस्त्याचे काम रखडले होते. या संदर्भात तेथील जागा व अतिक्रमणधारकांशी चर्चा करून मार्ग काढण्यात आला आहे. तेथील नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्याची तयारी दर्शवली आहे. इतर ठिकाणी भूमिअभिलेख विभागाने रस्त्याची मोजणी करून देत जागा निश्चित करून दिली आहे. तेथील शेतकऱ्यांनीही या रस्त्याच्या कामासाठी सहकार्य केले आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामातील अडथळे दूर झाले असून, येत्या दोन महिन्यात काम पूर्ण करण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात आल्याचे आयुक्त डांगे यांनी सांगितले. दरम्यान, या रस्त्याचे काम झाल्यावर सोलापूर महामार्ग ते कानडे मळा रस्त्याला जोडणारा लिंक रस्ता तयार होणार आहे. कानडे मळा, सारसनगरकडे जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध वाहतूक या मार्गाने सुरू होणार आहे. तसेच, या रस्त्यामुळे स्टेशन रोड व सोलापूर महामार्ग जोडला जाणार असल्याचे डांगे यांनी स्पष्ट केले.

# आपापसात वाद मिटविणे महत्वाचे

## न्यायाधीश अंजू शेंडे; राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– प्रत्येकाला आपले हक्क मिळावे, यासाठी न्यायाची स्थापना झाली. आपले अधिकार मिळविण्यासाठी आपण न्यायालयात येतो, अधिकारांना मिळविण्यासाठी आपआपसातले वाद सामंजस्याने मिटवू शकतो. चांगला समाज तयार करण्यासाठी आपण चांगली वृत्ती आणि नको असलेली प्रकरणे काढण्याची तयारी ठेवावी. लोकन्यायालयामध्ये प्रकरणे सामजस्यांने मिटविण्याचे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर बार आणि सेंट्रल बार असोशिएशन, अहमदनगर यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार (दि. १०) राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन जिल्हा न्यायालय, तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये करण्यात आले. राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन रोपट्यास पाणी घालून पक्षकार आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश एम. एच. शेख, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील, जिल्हा सरकारी वकील सतिश पाटील, अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेश कातोरे, सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष अशोक कोठारी, पोलिस उपअधीक्षक गणेश उगले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला न्यायिक अधिकारी, विधिज्ञ आणि पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. ॲड. राजाभाऊ शिर्के यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. भक्ती शिरसाठ यांनी आभार मानले.

# नगरला एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा

## मुळानगर पाणी योजनेवरील उपसा पंप नादुरुस्त

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– अहिल्यानगर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुळानगर पाणी योजनेवरील उपसा पंप नादुरुस्त झाल्यामुळे शहरासह उपनगर भागात एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

मुळानगर पंपींग स्टेशन येथे ७२५ एचपीचे दोन पंप व ४०० एचपीचे २ पंप नियमित चालवून शहरास पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस असल्याने धरणाची पातळी खालवली आहे. त्यामुळे ४०० एचपीचा पर्यायी पंप चालवावा लागत आहे. हा पर्यायी पंप शुक्रवारी रात्री नादुरूस्त झाला आहे. तसेच ७२५ एचपीचा पर्यायी पंपही दुरूस्ती चालू असल्याने बंद आहे. त्यामुळे सद्यस्थितीत अतिरिक्त पंप उपलब्ध नसल्याने मुळानगर येथून होणारा पाण्याचा उपसा कमी झालेला आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक भागात एक दिवसाने उशिरा पाणीपुरवठा होणार आहे.

शनिवार (दि. १०) बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर, तसेच सारस नगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर भागास पाणी पुरवठा झालेला नाही. या भागात रविवारी (दि.११) पाणी पुरवठा होणार आहे. तर, रविवारी रोटेशन नुसार पाणी वाटप असलेल्या सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने मनपा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी या भागात सोमवारी (दि.१२) पाणी सोडण्यात येणार आहे. सोमवारी पाणी पुरवठा होऊ घातलेल्या मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टीव्ही सेंटर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर या भागात मंगळवारी (दि.१३) पाणी पुरवठा होणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

# वृद्धेच्या गळ्यातील दागिने ओरबडले

## घरात घुसून केले कृत्य; गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– घरात घुसून अज्ञात चोरट्याने घरामध्ये एकटी असलेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण व सोन्याच्या मण्याची पोत असा दोन लाख ७५ हजार रुपये किमंतीचा ओरबडून चोरून नेला ही घटना नगर तालुक्याची आगळगाव येथील टोकेवाडी येथे ९ मे रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात विकास तुळशीराम कराळे (रा. टोकेवाडी आगडगाव ता. नगर. हल्ली रा. त्रिमूर्ती चौक सारसनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे, यांच्या मूळ गावी आगडगाव परिसरातील टोकेवाडी येथे फिर्यादीची आई कमल तुळशीराम कराळे या घरी एकट्या असताना रात्री आठ वाजल्याच्या सुमारास एक २० ते २५ वयाचा, अंगात काळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेला व तोंडाला काळ्या रंगाचा मास्क लावलेला अनोळखी तरुण घरात घुसला घरात एकटे असलेल्या कमल कराळे यांच्या गळ्यातील ४ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, व एक सोन्याची पोत असा ऐवज बळजबरीने हिसकावून ओढून चोरुन नेला. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात विकास कराळे यांनी दिलेले फिर्यादीवरुने जबरी चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पतंगे हे करीत आहेत.

# नातेवाईकांच्या मदतीने पत्नीचा पतीवर हल्ला

## सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल; दागिने नेले, टीव्हीची तोडफोड

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील तिनखडी येथील दशरथ माधव खेडकर (वय ५५) यांच्यावर पत्नीने नातेवाईकांच्या मदतीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दशरथ खेडकर हे भिलवडे शिवारात त्यांच्या शेतातील घरामध्ये असताना २६ एप्रिलला रात्री ११.३० च्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत दशरथ खेडकर यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन सुरेखा दशरथ खेडकर, कौशला बाळासाहेब आंधळे, बाळासाहेब बबन आंधळे, रमेश बाळासाहेब आंधळे, राजेंद्र मुरलीधर मिसाळ, युवराज राजेंद्र मिसाळ, आणि अंकुश त्रिंबक महाजन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत म्हटले, पत्नी सुरेखा खेडकर ही काही दिवसांपूर्वी माहेरी गेली होती. परंतु २६ एप्रिलला रात्रीच्या सुमारास ती आपल्या नातेवाईकांसह सासरी पती दशरथ खेडकर यांच्या घरात आली. यावेळी कौशला आंधळे हिने लोखंडी गजाने दशरथ खेडकर डोक्यात मारहाण केली. त्यानंतर इतर नातेवाईकांनी मिळून घरात घुसून सोन्याची दागदागिने घेतले. एलईडी टीव्हीची तोडफोड केली, तसेच काही घरगुती साहित्य जाळून टाकले. अधिक तपास पाथर्डी पोलीस करीत आहे.

# दुकाने पाडण्यास न्यायालयाकडून स्थगिती

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – शहराच्या अजंठा चौक ते बाजारतळ या मार्गावर असलेली दुकाने दावा प्रलंबित असेपर्यंत पाडून टाकू नये असा आदेश अहिल्यानगर न्यायालयाने दिला असून न्यायालयाच्या या निर्णयामुळे या मार्गावर असलेल्या व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. पालिकेने बाजारतळावर नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम जवळपास पूर्ण केले असून हे बांधकाम करताना या मार्गावर असलेले अस्लम मणियार, गोपाल हारकुट व संतोष उदबत्ते यांनी आपली अतिक्रमणे काढून टाकावी अशी नोटीस पालिका प्रशासनाने या व्यवसायिकांना दिली होती. या नोटिसी विरोधात या व्यापाऱ्यांनी पाथर्डी येथील दिवाणी न्यायालयात मनाई हुकूम मिळावा असा दावा दाखल केला, मात्र पाथर्डी न्यायालयान तो फेटाळला. यानंतर व्यावसायिकांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले. या अपिलावर वारंवार सुनावण्या होऊन जिल्हा न्यायालयाने ३० एप्रिलला नगर परिषदेविरोधात मनाई हुकूम पारित करत जोपर्यंत दावा प्रलंबित आहे तोपर्यंत या दुकान पाडू नये असा आदेश जिल्हा न्यायाधीश एम.एच. शेख यांनी दिला. व्यावसायिकांच्यावतीने वकील सचिन बडे, आर. एन. खेडकर व शुभम मोरगावकर यांनी न्यायालयात बाजू मांडली.

# बेपत्ता दीपक उंडे अडीच वर्षांनंतरही सापडेना

## सीआयडी पथक दोन-तीन दिवसांपासून पारनेरात तळ ठोकून

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – अडीच वर्षांपासून बेपत्ता असलेला पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या येथील बजरंग दल व शिवसेनेचा युवा संघटक दीपक सुदाम उंडे या तरुणाचा अद्याप शोध लागलेला नाही. त्यामुळे आता पारनेर पोलिसांनंतर स्थानिक गन्हे शाखेकडून हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. सीआयडीचे तीन अधिकारी गेल्या दोन-तीन दिवसांपासून पारनेरमध्ये तळ ठोकून आहेत.

अडीच वर्षे उलटूनही दीपक उंडेचा तपास लागला नसल्याने कुटुंबीयांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका दाखल केली. न्यायालयाने या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करून दीपक मुंडेचे अपहरण झाले की, घातपात किंवा अन्य काही याचा नव्याने तपास करुन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश सीआयडीला दिले आहेत.

६ डिसेंबर २०२२ ला सुदाम श्रीपती उंडे (रा. कर्जुले हर्या) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात त्यांचा मुलगा दीपक उंडे बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलिस अधीक्षक, पोलिस निरीक्षक यांच्याकडे वेळोवेळी विनंती अर्ज केले. तपासाअंती या प्रकरणामध्ये ९ आरोपी निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. यातील काही आरोपींविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. मात्र, तपासादरम्यान पारनेर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर सादर केलेल्या रिमांड रिपोर्टनुसार व साक्षीदारांच्या जबाबानुसार दीपक उंडे याचा खून केल्याचे म्हटले आहे. तरीही आरोपींच्या विरोधात भा. दं. वि. कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केलेला नाही, असे सुदाम उंडे यांचे म्हणणे आहे. सुदाम उंडे यांनी ॲड. एन. बी. नरवडे यांच्या मार्फत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली आहे. दीपकचा मृतदेह मिळून येत नाही किंवा तो हरवला असल्याचेही निष्पन्न होत नाही. तपासी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार गुन्ह्यात योग्य माहिती मिळत नाही. हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

### न्यायालयाची तपासावर नाराजी

- बेपत्ता तरुण दीपक उंडे प्रकरणी पारनेर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासावर न्यायालयाने नार-ाजी व्यक्त केली आहे. पारनेर पोलिसांकडे हा तपास सोपविण्यात आला होता. नंतर तो तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला. परंतु, २०२४मध्ये या प्रकरणाचा तपास करण्यात या दोन्ही यंत्रणांना अपयश आले. हा तपास आता नव्याने सीआयडीकडे वर्ग केला आहे.

# प्राध्यापकावर चाकू हल्ला करणारे दोघे जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलाजवळ प्राध्यापकावर लुटमारीच्या उद्देशाने करण्यात आलेल्या चाकू हल्ल्याप्रकरणी दोन संशयित आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. तर एक संशयित आरोपी अद्यापही पसार असून, पोलिस त्याच्या मागावर आहेत. गुन्ह्यात वापरलेली ९० हजार रुपये किंमतीची मोपेड देखील जप्त करण्यात आली आहे.

निखील विकास बोरकर (रा. पुसद, जि. यवतमाळ) हे ६ मे रोजी पहाटे सुमारास श्वासोच्छवासास त्रास होऊ लागल्याने घराबाहेर पडले होते. रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलावरून जात असताना तीन अज्ञात इसम मोपेडवरून आले आणि त्यांनी त्यांना अडवले. खिसे तपासूनही काहीही न मिळाल्यामुळे त्यांनी बोरकर यांचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. बोरकर यांनी प्रतिकार केल्यामुळे त्यांच्यावर चाकूने हात व पाठीवर वार करण्यात आले. संशयित आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. घटनेनंतर कोतवाली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. यात प्रविण राजू चांदणे (वय १९) आणि राहुल राजू भोसले (वय २०, दोघेही रा. सिद्धार्थनगर, नगर) यांना अटक करण्यात आली. हे दोघेही मोपेडवर असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांना सिद्धार्थनगर येथे सापडल्यावर ताब्यात घेतले. तिसरा संशयित आरोपी गणेश विजय लोमटे (रा. प्रेमदान हाडको, नगर) पसार असून त्याचा शोध सुरू आहे.